माहितीचा अधिकार


महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
३ रा मजला, ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
जे.एन.हरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

**दुरध्वनी क्रमांक : 022-22622036** **ई-मेल : jd.kosh@mahakosh.in**


संदर्भ - १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर१२१२/प्र.क्र.३१/सेवा ९/दि.११.०२.२०१३
२. शासन आदेश क्र. संलेको-२०१४/प्र.क्र.१६८/कोषा प्रशा -२ दि.५.२.२०१८.
३. संचालनालयाचे आदेश क्र. ०४-२०१८/प्रशा-राप/कार्या-६/श्री का.बा.गर्जे/३७० दि १९.०४.२०१८
४.महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन आदेश क्र.संलेको-२०१८/प्र.क्र.१४/कोषा प्रशा २ मुंबई दि.१८.०५.२०१८
५..श्री.का.बा.गर्जे ,उपसंचालक यांचा दि.२०.११.२०१८ चा विकल्पाचा अर्ज
६. संचालनालयाचे आदेश क्र. संलेको ११.२०१८/गोअक/स.अ.१/वेनि/काबागर्जे/३६० दि.०४.१२.२०१८
७. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको-२०१८/प्रशा राप/सअ१/आप्रयो/पहिला/दुसरा लाभ/११३० दि.१२.१२.२०१८

क्र.संलेको १२.२०१८/गोअक/स.अ.१/वेनि/काबागर्जे / ००४ दिनांक - 03 JAN 2019

## आ दे श

उपरोक्त संदर्भ क्र २ च्या शासन आदेशानुसार , महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील, श्री गर्जे यांना सहाय्यक संचालक या पदोन्नतीच्या पदाचा मानीव दिनांक हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून दि ३१.८.२००३ पासून शासन मंजूरी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने, श्री गर्जे यांचे संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये मानीव दिनांकानुसार दि ३१.८.२००३ पासून सहाय्यक संचालक पदाची वेतननिश्चिती करण्यात आली आहे. तसेच सदर आदेशात सहाव्या वेतन आयोगानुसार सहाय्यक संचालक पदाची वेतननिश्चिती ही मानीव दिनांकाच्या अनुषंगाने करण्यात आली आहे. तसेच श्री गर्जे यांना दि ३१.०८.२००३ हा सहायक संचालक पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यात आल्याने संचालनालयाचे आदेश दि १३.०४.२००७ अन्वये त्यांना दि. १४.१२.२००५ रोजी सहाय्यक संचालक पदाचा देण्यात आलेला पहिला लाभ आपोआपच संपुष्टात येत आहे. ( एकाच पदावर १२ वर्ष पूर्ण होण्याअगोदरच पदोन्नती)

सद्यस्थितीत संदर्भ क्र. ४ च्या शासन आदेशान्वये, सहाय्यक संचालक संवर्गातील श्री. कारभारी बा गर्जे.यांची महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गात वेतनबँड रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु . ६६००/- या वेतन संरचनेत , मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका , कल्याण या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे. सदर पदावर श्री गर्जे दि. १९.५.२०१८ म.पू रोजी हजर झाले . संदर्भ क्र. ५ अन्वये श्री. गर्जे यांनी दि.०१.०७.२०१८ रोजी वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प दिल्याने संदर्भ क्र. ६ अन्वये श्री.कारभारी बा.गर्जे यांची विकल्पासह वेतननिश्चिती करण्यात आली होती.

परंतु श्री.का.बा.गर्जे, यांना सहाय्यक संचालक पदोन्नतीचा मानीव दिनांक ३१.०८.२००३ पासून मंजूर झाल्याने त्या अनुषगाने त्यांना वेतनबँड रू. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रू.५४०० या सुधारीत वेतनसंरचनेतील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ (वरिष्ठ) संवर्गातील वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.६६०० या सुधारीत वेतनसंरचनेत दि.३१.०८.२०१५ पासून सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ संदर्भ क्र. ७ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे संदर्भ क्र. ६ अन्वये निर्गमित केलेले आदेश आपोआप संपुष्टात येत आहेत. तसेच श्री.गर्जे यांच्या उपसंचालक संवर्गातील पदोन्नतीच्या पदावरील पुन:वेतननिश्चिती करण्याची आवश्यकता नाही.

तथापि, श्री.का.बा.गर्जे यांची आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**विद्यमान वेतनश्रेणी : वेतनबँड १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००**

**आश्वासित प्रगती योजनेनुसार पदोन्नतीनंतरची वेतनश्रेणी : वेतनबँड १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००**

| क्रमांक | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढीनंतरचे वेतन | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन | ग्रेड वेतन | |
| i | ii | iii | iv | V |
| १ | ०१.०७.२०१५ | २४६४० | ५४०० | |
| २ | ३१.०८.२०१५(आप्रयो पहिला लाभ) | २५५५० | ६६०० | |
| ३ | ०१.०७.२०१६ | २६५२० | ६६०० | |
| ४ | ०१.०७.२०१७ | २७५२० | ६६०० | १) दि.२९.१२.२०१७ ते ०३.०१.२०१८ (१२दिवस ) प्रतिक्षाधीन कालावधी, २) दि.१०.०१.२०१८ ते १२.०१.२०१८ (०३ दिवस) परिवर्तीत रजा, ३) दि.१३.०१.२०१८ ते २९.०१.२०१८ (१७ दिवस) प्रतिक्षाधीन कालावधी, ४) दि.३०.०१.२०१८ ते ०१.०२.२०१८ (०३दिवस) परिवर्तीत रजा, ५) दि.०२.०२.२०१८ ते १९.०३.२०१८ (४६ दिवस) प्रतिक्षाधीन कालावधी, ६) दि.२०.०३.२०१८ ते २३.०३.२०१८ (०४ दिवस)परिवर्तीत रजा, ७) दि.२४.०३.२०१८ ते १८.०५.२०१८ (५६ दिवस) परिवर्तीत रजा |
| ५ | १९.०५.२०१८ (पदोन्नती) | २७५२० | ६६०० | उपसंचालक पदावर रूजु |
| ६ | ०१.०७.२०१८ | २८५५० | ६६०० | नियमित वेतनवाढ |

**पुढील वेतनवाढ दि.०१.०७.२०१९**

उपरोक्त वेतननिश्चिती ही वेतन पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. तसेच दि.२९.१२.२०१७ ते १८.०५.२०१८ पर्यंतचा सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी शासनाकडून मंजुर झाला आहे यास्तव सदर कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक ,लेखा व कोषागारे, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(ज.र.मेनन)
संचालक
लेखा व कोषागारे, मुंबई

प्रत : १) सहसंचालक , लेखा व कोषागारे , पुणे
२) श्री.का.बा.गर्जे , उपसंचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना माहितीस्तव
३) सहाय्यक संचालक, प्रशासन राजपत्रित शाखा , मुख्यालय
४) निवड नस्ती